नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsakola@yahoo.com

अमरावती, कृषी हवामान सल्ला मंगळवार दिनांक – २० ऑक्टोबर २०२०

हवामान घटक	हवामान अंदाज (दिनांक २१ ते २५ ऑक्टोबर)				
दिनांक	२१/१०	२२/१०	२३/१०	२४/१०	२५/१०
पाऊस (मिमी)	3	2	०	०	०
कमाल तापमान (अं.से.)	३4	३३	३४	३३	३३
किमान तापमान (अं.से.)	२2	२2	२2	२2	२2
सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	८3	7८	75	70	70
दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	65	63	65	55	50
वा-याचा वेग (किमी / तास)	२	२	२	२	२
वा-याची दिशा	73	69	68	71	99
ढग स्थिती (आकाश)	अंशतः ढगाळ	अंशतः ढगाळ	अंशतः ढगाळ	अंशतः ढगाळ	अंशतः ढगाळ

हवामानाचा इशारा	हवामान अंदाजानुसार दिनांक २०, २१, व २२ ऑक्टोबरला काही ठिकाणी (विरळ) हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसेच दिनांक २३-२४ ऑक्टोबर दरम्यान हवामान कोरडे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.	
पिकांचे नाव	अवस्था	कृषि हवामान सल्ला
सर्व पिके		सर्व पिकात फवारणी करतांना स्थानिक वातावरण व हवेची दिशा पाहून फवारणी करावी. प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहेत्यामुळे ,व काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पाऊस होण्याची शक्यता आहे , ज्याठिकाणी अतिरिक्तपाणी साचेल तेथिल पाणी त्वरित बाहेर काढावे.
कपाशी	फुल पाती/ बोंड	अगोदर पेरणी केलेले कपाशी पिक वेचणीला आले आहे तरी कापूस वेचतांना प्रतवार व वाण प्रत वेचून त्याची सुकलेल्या सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावे. कपाशी पिकातील बोंडसड व इतर बुरशीजन्य रोगाच्या नियंत्राणासाठी कार्बेन्डॅझिम ५० डब्लूपी प्रती २० ग्रॅम किंवा प्रोपिकॉनाझोल २५ ईसी १० मि.ली प्रती किंवा प्यराक्लोस्त्रोबीन २० डब्लूपि २० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कपाशीमधील आतील बोंडसड व इतर बुरशीजन्य रोगाच्या नियंत्राणासाठी कॉपर ऑक्सीक्लोरीड ५० डब्लूपि प्रती २५ ग्रॅम अधिक स्ट्रीपटोसायक्कलीन प्रती १-२ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कपाशी पिकातील बोंड अवस्थेत लाल्या वेवेस्थापनसाठी ०१ टक्के युरिया अधिक ०१ टक्के मेग्नेसिअम सल्फेटची पाण्यात मिसळून फवारणी करावी. पिकात शेंदरी बोंड अळीच्या नियमित सर्वेक्षण करून हेक्टरी ४ ते ५ फेरोमेन सापळे लावावी व वेळोवेळी त्यामधील ल्युर बदलावी व त्या सोबतच "टी" आकाराचे १० पक्षी थांबे प्रती एकर उभारावेत. ज्या वेळी ट्रेपमध्ये ८-१० प्रौड पतंग सापडली त्या वेळी त्याच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा १५०० पीपीएम अझाडीरेक्टीन प्रती २५ मि.ली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फुलावस्थेत दर आठवड्याने पिकामध्ये मजुराच्या साहाय्याने डोमकळ्या (गुलाबी बोन्ड अळी ग्रस्त फुले) शोधून नष्ट कराव्या.

		क्रिडक्या बोन्डाची आर्थिक नुकसान पातळी ५ ते १०% असल्यास थायोडीकार्ब २५% डब्ल्यूपी २५ ग्रॅम किंवा क्विनॉलफॉस २५% एएफ २५ मिली किंवा क्लोरपायरीफॉस २५% प्रवाही २५ मिली किंवा प्रोफेनोफॉस ५०% ३० मिली किंवा इन्डोक्झाकार्ब १५.% १० मिली या पैकी कोणतेही एक कीटकनाशक १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. जेथे प्रादुर्भाव १० टक्केच्या वर आहे अशा ठिकाणी आवश्यकतेनुसार प्रादुर्भाव पुढे वाढू नये म्हणून पुढील कोणत्याही एका मिश्र कीटकनाशकाची, ट्रायझोफॉस ३५% +डेल्टामेथ्रीन १ टक्के १७ मिली किंवा क्लोरान्ट्रोनिलीप्रोल ९.३ टक्के+लेम्बडासायहॅलोथ्रीन ४.५% ५ मिली किंवा क्लोरपायरीफॉस ५० टक्के +सायपरमेथ्रीन ५ टक्के २० मिली किंवा इन्डोक्झाकार्ब १४.५ टक्के+ऍसिटामाप्रिड ७.७ टक्के १० मिली या पैकी कोणतेही एक मिश्र कीटकनाशक १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. जेथे पान तुडतुडा चा प्रादुर्भाव नुकसान संकेत पातळी पेक्षा जास्तआहे तिथे इमिडाक्लोरीप्रीड १७.८ टक्के एसएल ३ मिली किंवा ऍसिटामाप्रिड २० टक्के एसपी प्रती ४० ग्रॅम या पैकी कोणतेही एक कीटकनाशक १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
सोयाबीन	परिपक्वता	ज्या ठिकाणी सोयाबीन पक्व झाले आहे त्याठिकाणी स्थानिक वातावरणाचा अंदाज घेऊन पिक कापून सोगुंन घ्यावे आणि काढलेला व तयार झालेला माल सुरक्षित ठिकाणी ठेवावा. कापणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी ठेवावे. सोयाबीनची मळणी करताना दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १३-१५ टक्के असावे आणि मळणी यंत्राच्या ड्रमची गती ३५०-४०० फेरे प्रती मिनिट (आर.पी.एम.) या दरम्यान असावी जेणेकरून बियाण्याला इजा पोहोचणार नाही आणि उगवण शक्तीवर परिणाम होणार नाही. साठवणूक करताना बियाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १२ टक्के पेक्षा जास्त नसावे.
तूर	वाढ	तूर पिकात हेलीकोव्हरपा अळीच्या सर्वेक्षणासाठी ५ कामगंध सापळे प्रती हेक्टरी या प्रमाणे उभारावेत व त्यासोबतच पक्षी थांबे उभारावेत. तूर पिकात गुंडाळलेली पाने व जाळे असलेली पाने काढून ती नष्ट करावी.
रब्बी ज्वारी	पेरणी	बागायती रब्बी ज्वारीची पेरणी ३१ ऑक्टोबरपर्यंत करावी. रब्बी पिकामध्ये रब्बी ज्वारी या पिकाचा समावेश करावयचा असल्यास पिकेव्ही - क्रांती, या वाणांची निवड करावी. पिकामध्ये नत्र स्थिर करण्यासाठी, स्पुरद उपलब्ध होण्यासाठी व मातीतील बुरशीजन्य रोगांपासून बचावासाठी अझोटोबाक्टेर व पीएसबी जीवाणुसंवर्धक २५ ग्रॅम व ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी. बागायती रबी ज्वारीकरिता ८० किलो नत्र, ४० किलो स्फुरद, ४० किलो पालाश प्रती हेक्टरी या प्रमाणे खताची संपूर्ण मात्रा पेरणीच्या वेळीच द्यावी.
करडी	पेरणी	ओलिताखालील करडईची पेरणी ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात पर्यंत करावी. उशिरात उशिरा नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात करावी. त्याकरिता शिफारसकेल्या भीमा, एकेएस -२०७, पिकेव्ही - पिंक, किंवा नारी -६ या वाणची निवड करावी. पिकामध्ये नत्र स्थिर करण्यासाठी, स्पुरद उपलब्ध होण्यासाठी व मातीतील बुरशीजन्य रोगांपासून बचावासाठी अझोटोबाक्टेर व पीएसबी जीवाणुसंवर्धक २० ग्रॅम व ट्रायकोडर्मा ४ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी.
जवस	पेरणी	रब्बी पिकामध्ये जवस या पिकाचा समावेश करावयचा असल्यास ओलिताखालील जवस पिकाची पेरणी नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत करावी. पिकामध्ये नत्र स्थिर करण्यासाठी, स्पुरद उपलब्ध होण्यासाठी व मातीतील बुरशीजन्य रोगांपासून बचावासाठी अझोटोबाक्टेर व पीएसबी जीवाणुसंवर्धक २५ ग्रॅम व ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी. बागायती जवस पिकासाठी ६० किलो नत्र व ३० किलो स्फुरद प्रती हेक्टरी या प्रमाणे खताची संपूर्ण मात्र पेरणीच्या वेळेस द्यावी. जवस पिकात आंतरपीक पद्धतीमध्ये जवस + हरभरा (४:२) किंवा जवस +करडई(४:२) याप्रमाणे आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आहे.
हरभरा	पेरणी	रब्बी पिकामध्ये हरभरा या पिकाचा समावेश करावयचा असल्यास ओलिताखालील हरभऱ्याची पेरणी ऑक्टोबरच्या शेवटचा पंधरवडा ते १० नोव्हेंबर दरम्यान करावी. त्याकरिता वाण जाकी९२१८, पीडीकेव्ही कांचन, विजय, विशाल, आयसीसीवि-२ , आयसीसीवि-१० यापैकी कोणताही वाणाची निवड करावी. मर प्रतिबंधक जातीमध्ये जाकी९२१८,विशाल, आयसीसीवि-२ , आयसीसीवि-१० या जातींचा समावेश होतो. पिकामध्ये नत्र स्थिर करण्यासाठी, स्पुरद उपलब्ध होण्यासाठी व मातीतील बुरशीजन्य रोगांपासून बचावासाठी रायझोबीअम व पीएसबी जीवाणुसंवर्धक २५ ग्रॅम व ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी. बागायती हरभरा पिकासाठी २५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद, ३० किलो पालाश प्रती हेक्टरी या प्रमाणे खताची संपूर्ण मात्र पेरणीच्या वेळेस द्यावी. हरभरा पिकात हरभऱ्याच्या सहा ओळी आणि रबी ज्वारीच्या दोन ओळी याप्रमाणे आंतरपीक पद्धती फायदेशीर आहे.
फळझाडे	वाढ	फळाबागेतील आळे तण विरहीत ठेवावे. निंबू फळाबागेतील हस्त बहाराच्या नियोजनाच्यासाठी पॉटासीअम नायट्रेट २ टक्के वापरावे.

		सत्रापिकला त्याच्या वयानुसार शिफारस खत द्यावे.
भाजीपाला	वाढ	गादीवाफ्यावर कांदा बियाणे फुले ,अकोला सफेद : पांढऱ्या जाती.पेरावे (किलो १० ते ८ हेक्टरी) २ एन ,पुसा रेड-लाल ,पुसा व्हाईट राउंड ,भीमा श्वेता ,यशोदा ,सफेद-४७८० बसवंत,५३-निफाड ,१-. कोथिंबीर वाटणा ,गवार ,गाजर ,बटाटा ,श्रावण घेवडा ,पालक ,मेथी ,मुला ,लसून , संभार) .भाजीपाला पिकांची लागवड करावी.इ
पशु / जनावरे	-	पायखुरी व तोंडखुरी रोगाच्या संरक्षणासाठी पशुधन व दुग्ध जनावरांचे लसीकरण करावे. वर्तविण्यात आलेल्या हवामान अंदाजानुसार कडकडाटनाऱ्या विजा व वादळीवाऱ्यापासून बचावासाठी पशु व जनावारांना संरक्षित ठिकाणी बांधावे.

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय, मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.